ग्लोबल मिशन स्कूलमध्ये योगा दिन साजरा

पारोळा । प्रतिनिधी

ग्लोबल मिशन स्कुल बाहुटे (GMS) येथे २१ जून हा योगा दिवस मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आला प्रथम सरस्वती पुजन करुन पुढिल कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. योग अभ्यासिका श्रीमती सौ डॉ विशाखा पाटील यांनी स्वतः योगा करुन ग्लोबल मिशन स्कुलचे चेअरमन मनोहर पंडीत पाटील यांनीही योगा केला आणि विद्यार्थ्यांन कडुन योगा करवुन घेतला नंतर प्रत्येक विद्यार्थ्यांचे शारीरिक आरोग्य तपासणी एरंडोल येथील बालरोगतज्ज्ञ डॉ मिलिंद पाटील व डॉ श्रृती एम पाटीलयांच्या हस्ते करण्यात आली. योगा दिवस व विद्यार्थ्यांचे आरोग्य तपासणी शिबिर यशस्वीतेसाठी ग्लोबल मिशन स्कुलचे चेअरमन मनोहर पंडीत पाटील प्रिन्सिपॉल उमाकांत बुंदेले सर उप प्रिन्सिपॉल सौ.उज्वला पाटील पद्माकर पाटील प्रा.एस जे पाटील यांनी आपल्या प्रयत्नांती कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडला. सुत्रसंचलन बिकास झा यांनी केले कार्यक्रमाच्या शेवटी आभार ग्लोबल मिशन स्कुलचे संस्थापक अध्यक्ष मनोहर पंडीत पाटील यांनी मानले.

सार्वे बाभळे विद्यालयात शिष्यवृत्ती वाटप

पारोळा । प्रतिनिधी

ज्ञानदीप बहुउद्देशीय विद्या प्रसारक मंडळ संचलित माध्यमिक विद्यालय सार्वे बाभळे येथे दि.१९ जून रोजी शिष्यवृत्ती वाटप समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थी मधील भिल्ल, ठाकूर, पावरा समाज विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ची सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती ज्ञानदीप संस्थेचे अध्यक्ष भैय्यासाहेब पवार यांच्या मार्गदर्शनाने वाटप करण्यात आली. शाळेतील एकूण १४१ विद्यार्थ्यांना २ लाख ५५ हजार रुपये शिष्यवृत्ती शाळेचे मुख्याध्यापक दीपक मुरलीधर पाटील यांच्या हस्ते वाटप करण्यात आली. ही शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांच्या खात्यात वर्ग करण्यात आली. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च सुरुवातीला शिष्यवृत्ती रक्कम मिळाल्याने पालक व विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले. यशस्वीतेसाठी शिक्षक रंगराव साळुंखे, बाळासाहेब निकुंभ, सचिन पाटील, कविता सोनवणे, हरीश पाटील, मोनाली पाटील, दीपक श्रीराम पाटील, निलेश पाटील, उमाकांत बाविस्कर, सुनील पाटील यांचे योगदान लाभले.

डॉ.शांताराम पाटील यांचा सत्कार

पारोळा । प्रतिनिधी

येथील न्यू पीपल्स एज्युकेशन सोसायटी संचलित आदर्श माध्यमिक विद्यालय व्यंकटेशनगर शाळेत मुख्याध्यापक डॉ.शांताराम दाजीबा पाटील नियत वयोमानानुसार आपला २१ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. यानिमित्त मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी जिल्ह्याचे माजी पालकमंत्री डॉ.सतीश भास्करराव पाटील होते तर व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून पदवीधर आ.सत्यजित तांबे, माजी नगराध्यक्ष करण पवार, ग स सोसायटीचे माजी अध्यक्ष मनोज पाटील, विद्यमान अध्यक्ष अजबसिंग पाटील माजी सभापती मनोराज पाटील, माध्यमिक सोसायटीचे माजी अध्यक्ष संभाजी पाटील, बालाजी विद्या प्रबोधिनीचे अध्यक्ष यु एच करोडपती, ज्ञानदीप संस्थेचे चेअरमन भैय्यासाहेब धर्मराज पवार गटशिक्षणाधिकारी विश्वास पाटील शापोआ अधीक्षक सी एम चौधरी ग स संचालक अजय पाटील, तामसवाडी देवगाव गटाचे जिल्हा परिषद सदस्य रोहन पाटील, राजेंद्र शिंदे, संतोष महाजन, मोंढाळे येथील सरपंच अनिल पाटील यांच्यासह विविध संस्थांचे अध्यक्ष पदाधिकारी, मुख्याध्यापक शिक्षक वृंद शिक्षकेतर कर्मचारी नातेवाई उपस्थित होते.

पारोळा येथे शिवसेनेचा वर्धापन दिन साजरा

पारोळा । प्रतिनिधी

मराठी माणसाच्या न्याय हक्कांसाठी आणि मराठी माणसाला स्वाभिमानानं जगण्यासाठी हिंदुहृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांनी १९ जून १९६६ रोजी शिवसेना या संघटनेची स्थापना केली. आज शिवसेना या संघटनेला ५९ वर्ष पूर्ण होतायेत. त्यानिमित्त पारोळा येथील शिवसेना कार्यालयात मा.आमदार चिमणराव पाटील यांच्या शुभहस्ते हिंदुहृदयसम्राट स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पुजन करून वर्धापन दिन साजरा करण्यात आला व शिवसेना सदस्य नोंदणी अभियानाला सुरवात करण्यात आली. याप्रसंगी तालुकाप्रमुख मधुकर पाटील, पारोळा बाजार समितीचे मा.संचालक बी.एन.पाटील, शेतकरी सहकारी संघाचे संचालक साहेबराव पाटील, शिरसमणी मा.सरपंच सुदाम पाटील, बाहूटे सरपंच अरुण पाटील, धीरज महाजन, भटूशेठ शिंपी, प्रविण पाटील, मयूर भोई, कोमल पाटील, चेतन पाटील, महेंद्र गिरासे यांचेसह शिवसैनिक उपस्थित होते.

दि जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. जळगाव

जाहिर नोटीस

१. श्री. कडू सापुर्डा इंगळे, लॉकर नं. १/३ पत्ता विद्या कॉलनी, मु.पो.ता.बोदवड, जि. जळगाव २. श्री. मोहनलाल लक्ष्मीनारायण अग्रवाल, लॉकर नं. १/१३ पत्ता गांधी चौक, रतन ज्वेलर्स जवळ मु.पो.ता.बोदवड, जि.जळगाव ३. कांतिलाल उगमचंद जैन लॉकर नं. १/१५, पत्ता- गांधी चौक पाकीजा हॉटेल जवळ, मु.पो.ता.बोदवड, जि. जळगाव. ४. श्री. काशिनाथ दामू वंजारी लॉकर नं. २/१३ पत्ता- नाईक वाडा, मु.पो.ता.बोदवड, जि.जळगाव

वरील इसम हे आमचे बोदवड शाखेतील बँकेचे लॉकरधारक असून, त्यांना वारंवार लेखी सूचना देवून देखील ते बँकेत येत नसून, त्यांचेकडील बँकेचे लॉकर भाडे थकीत झालेले आहे. त्यांना त्यांचे वरील अधिकृत पत्त्यावर ते उपलब्ध नसल्याने पाठविलेले रजिस्टर पाकीट बँकेकडे परत आलेले आहे. संबंधीत लॉकरधारक अथवा त्यांचे कोणी वारस असल्यास त्यांना सदर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाले पासून, सात दिवसांचे आत बँकेशी संपर्क साधावा अन्यथा आपले लॉकर पंच समक्ष उघडून (तोडून) त्यातील मालमत्तेचा पंचनामा करुन सदर मालमत्ता बँक लॉकर भाडे व खर्च नुकसानीपोटी जप्त करुन बँकेच्या ताब्यात ठेवून सदर लॉकर दुसऱ्या ग्राहकाना भाड्याने देण्यात येईल याची नोंद घ्यावी टिप- अधिक माहितीसाठी बोदवड बँकेशी संपर्क साधावा.

सही/-

शाखा व्यवस्थापक,

दि. जळगाव जिल्हा मध्य. सह बँक लि. बोदवड शाखा

आणीबाणीत तुरुंगवास भोगणाऱ्यांचा सन्मान

चाळीसगाव । प्रतिनिधी

भारतीय लोकशाहीवरील काळा डाग असणाऱ्या आणीबाणीला ५० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आणीबाणीविरोधात संघर्ष करत प्रसंगी कारावास भोगणारे चाळीसगाव तालुक्यातील जेष्ठ सेनानी तसेच व दिवंगत असलेले सेनानी यांच्या कुटुंबीयांचा सत्कार भाजपा चाळीसगाव शहर मंडळातर्फे आ.मंगेश चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आला.

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक मैदानात आयोजित या कार्यक्रमात संविधान वाचवण्यासाठी संघर्ष करणारे सेनानी स्व.डॉ.वा.ग पूर्णपात्रे यांचे नातू डॉ.सत्यजितजी पूर्णपात्रे (चाळीसगाव), स्व.शिवाजी दत्तात्रय पालवे चाळीसगाव यांचे चिरंजीव प्रशांत शिवाजी पालवे (चाळीसगाव), स्व.जगन्नाथ गोबन राठोड यांचे चिरंजीव मच्छिन्द्र राठोड (वलठाण), स्व.सुखलाल मराठे यांचे चिरंजीव यशवंतभाऊ मराठे (चाळीसगाव), रंगराव बालाजी साबळे (करजगाव), दिलीप लक्ष्मणराव गवळी (चाळीसगाव), पंडित रामचंद्र स्वार यांचे नातू सचिन स्वार (चाळीसगाव), स्व.नागो वस्ताद महानुभाव यांची नात श्रीमती सुवर्णा अशोक महानुभाव, चंद्रकांत विश्वनाथ फासे यांचे नातू योगेश फासे, दिनकर देविदास देव यांचे पुतणे मिलिंद देव यांचा सत्कार संपन्न झाला. यावेळी भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आणीबाणीच्या काळात त्यांनी व कुटुंबीयांनी भोगलेल्या यातना, देशावर कोसळलेल संकट, संविधान व नितीमूल्यांची झालेली हत्या याविषयी आपले अनुभव व्यक्त केले. आ.मंगेश चव्हाण यांनी देखील संवाद साधत सर्वांविषयी कृतज्ञता व्यक्त करती सांगतीले की, २५ जून १९७५ ही ती तारीख आहे, ज्या दिवशी देशावर आणीबाणी लादण्यात आली. आज या घटनेला ५० वर्षे पूर्ण झाली, पण त्या दिवसाची आठवण अजूनही अंगावर काटा आणते. देशाच्या जनमानसात जे घडलं त्याची जाणीव आजही मनात ताजी आहे. एका निवडणुकीत पराभव होण्याची भीती आणि लोकशाहीच्या रचनेवर निर्माण झालेलं संकट यामुळे तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधींनी संविधानाच्या अनुच्छेद ३५२ चा गैरवापर करत आणीबाणी लागू केली. ज्यांनी या काळात तुरुंगवास भोगला, त्यांचं योगदान अविस्मरणीय आहे. त्यांचं केलेला त्याग केवळ व्यक्तिशः नव्हे, तर भारतीय लोकशाहीच्या पुनर्जन्मासाठी होतं. त्यांनी झुकणं नाकारलं आणि एक आशेचा दीप तेव्हाही जिवंत ठेवला. या महान कार्यकर्त्यांमध्ये जयप्रकाश नारायण, अटल बिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, मोरारजी देसाई, नानाजी देशमुख, आणि कित्येक पत्रकार हे सारे लोक एकच संदेश देत होते. लोकशाही वाचवा, त्यांनी दिलेला तो लढा १९७७ मध्ये फळाला आला. जनता उठली, इतिहासात प्रथमच काँग्रेस पक्ष सत्तेतून बाहेर फेकला गेला. लोकांनी तानाशाही काँग्रेस नाकारली आणि लोकशाहीला पुन्हा उभं केलं. काँग्रेस पक्षाने जो तो काळ गडद केला, तो काळ आज विसरणं हा लोकशाहीच्या मूळ तत्वांशी गद्दारी ठरेल आणि म्हणूनच आम्ही या दिवसाला संविधान हत्या दिवस म्हणतो. ही केवळ ऐतिहासिक आठवण नाही, तर लोकशाहीची किंमत काय असते, याची सततची आठवण आहे. आज आपलं सरकार पंतप्रधान नरेंद्र मोदीजींच्या नेतृत्वाखाली लोकशाहीच्या रक्षणासाठी पूर्ण कटिबद्ध आहे.

मुसळधार पावसामुळे दगावलेल्या मयतांच्या वारसांना शासकीय मदत; आ.अमोल पाटील यांचे प्रयत्न

एरंडोल । प्रतिनिधी

तालुक्यात दि.११ जून २०२५ रोजी वादळीवाऱ्यासह मुसळधार पावसाने शेती, घरे, गोठे यांसह अन्य निवाऱ्याचा साधनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. यात वादळीवाऱ्यासह मुसळधार पावसामुळे एरंडोल तालुक्यातील मौजे रिंगणगाव येथीलजगन्नाथ श्रावण रोहिमारे हे घराची भिंत पडून तर मौजे फरकांडे येथील नारायण सीताराम पाटील हे घराची पत्रांमुळे मयत झाले होते. आ.अमोल पाटील यांच्या प्रयत्नाने मयतांच्या वर्षांना चार चार लाख रुपये खात्यात जमा झाले आहे.

वादळीवाऱ्यासह मुसळधार पावसाने खूप मोठे नुकसान झाले होते. यात शेती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान, घरांची पडझड, रस्त्यांवर झाडे पडून दळणवळण ठप्प, विजेचे पोल पडून विद्युत पुरवठा खंडित, पशुधन दगावले यांसह जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले होते. या सर्व नुकसानीचे सरसकट पंचनामे करण्याचा सूचना यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना आ.अमोल पाटील यांना केल्या होत्या. तसेच दुसऱ्या दिवशी या नुकसानग्रस्त भागाची पाहणी देखील केली होती.

या नुकसानीसह मौजे रिंगणगाव येथील कै.जगन्नाथ श्रावण रोहिमारे यांचा व कै.नारायण सीताराम पाटील यांचा मृत्यू झाला होता. दोनही मयत व्यक्ती हे कुटुंबातील कर्ता पुरुष असल्याने कुटुंबाची सर्वस्वी जबाबदारी त्यांचेवर अवलंबून होती. अशात त्यांचा निधनाने कुटुंबावर उपासमारीची वेळ आलेली होती. परंतु आ.अमोल पाटील यांनी या कुटुंबांच्या सांत्वन भेटीवेळी कुटुंबाला सर्वतोपरी सहकार्य व मदत करण्याचे आश्वासित केले होते. कुटुंबांचा मदतीसाठी सातत्याने पाठपुरावा करीत होते.

या तत्परतेमुळे कै.जगन्नाथ श्रावण रोहिमारे यांच्या पत्नी पुंजाबाई जगन्नाथ रोहिमारे व कै.नारायण सीताराम पाटील यांचा मुलगा गजानन नारायण पाटील या वारसांना प्रत्येकी ४ लक्ष रुपये सानुग्रह अनुदान वाटप केल्याबाबत प्रमाणपत्राचे वाटप आ.अमोल पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी तहसिलदार प्रदीप पाटील, जिल्हाप्रमुख वासुदेव पाटील, निवासी नायब तहसिलदार संजय घुले, नायब तहसिलदार दिलीप पाटील उपस्थित होते.

नॉन लिंकिंग युरिया व डीएपी खत उपलब्ध करून द्यावे!

आ.अमोल जावळे यांची कृषी मंत्र्यांकडे मागणी

फैजपूर । प्रतिनिधी

सध्या जळगाव जिल्ह्यातील अनेक तालुक्यांमध्ये, विशेषतः रावेर मतदारसंघात, शेतकऱ्यांना युरिया व डीएपी या अत्यावश्यक खतांचा तीव्र तुटवडा जाणवत आहे. लिंकिंग प्रणालीच्या अंमलबजावणीमुळे अनेक शेतकऱ्यांना वेळेवर खत मिळत नसल्याने खरीप हंगामावर प्रतिकूल परिणाम होत आहे.

या पार्श्वभूमीवर, रावेरचे आ.अमोल जावळे यांनी जिल्हाधिकारी जळगाव तसेच महाराष्ट्र राज्याचे कृषी मंत्री ना.माणिकराव कोकाटे यांना निवेदन देत लिंकिंग शिवाय (Non-Linking) युरिया व डीएपी खत तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. शेतकऱ्यांना वेळेत आणि पुरेशा प्रमाणात खत मिळावे, यासाठी जिल्हा प्रशासनाने तत्काळ पावले उचलावीत आणि खत वितरणात लवचिकता ठेवावी, अशी आग्रही भूमिका आमदार जावळे यांनी मांडली आहे.

डॉ.एकनाथ खोडके यांचा सेवापूर्तीनिमित्त सत्कार

हिवरखेडा बु.,ता.जामनेर । वार्ताहर

डॉ.एकनाथ कौतिकराव खोडके यांनी गौसेवा गेल्या ३७ वर्ष सेवा केली. दि.७ जुलै १९८८ पासुन त्यांनी कापुसवाडी, लोहारा, मोयखेडा, जामठी, गोडखेड, वाकोद अशी ३७ वर्ष गौ सेवा केली. सेवानिवृत्त कार्यक्रम पंचायत समितीच्या वतीने व मित्र मंडळी मराठा मंगल कार्यालय जामनेर येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला जे.के.चव्हाण, काळे साहेब, जाधव साहेब, समाधान पाटील, राजधर पांढरे, डॉ.स्वन्पाजा लोखंडे, डॉ.व्यवहारे, अनिल गायकवाड, दशरथ बोरोले, सुदाम चौधरी, सुधाकर पाटील यांसह औषध प्रतिनिधी तालुक्यातील डॉक्टर नातेवाईक मित्र मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वडगाव येथील महिलेची आत्महत्या; पती, सासू, जेठविरुद्ध गुन्हा दाखल

निंभोरा बु., ता.रावेर । वार्ताहर



वडगाव ता.रावेर येथील विवाहित महिला मेहरूनिसा मोसिन तडवी वय २० हिने गळफास घेत आत्महत्या केल्याचे प्रथम मयताचे सासरे दगडू उस्मान तडवी रा. वडगाव यांनी निंभोरा पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्याने गु. र. नं. २०/२५ प्रमाणे अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. यानंतर मयताची आई रजिया फिरोज तडवी रा.पाल ता.रावेर यांनी निंभोरा पोलीस ठाण्यात संशयीत आरोपी तिचा पती मोसिन दगडू तडवी, सासू मिनाबाई दगडू तडवी, जेठ यासीन दगडू तडवी ,यांनी मयत महिला मेहरूनिसा मोसिन तडवी रा. वडगाव हिला मागील दोन वर्षापासून वरील आरोपींनी संगनमत करून पैशाच्या कारणावरून वेळोवेळी मानसिक शारीरिक छळ करून तिस आत्महत्येस प्रवृत्त केले तसेच क्रूर वागणूक देत असामान्य परिस्थितीत मरणास कारणीभूत ठरले या संदर्भात निंभोरा पोलीस ठाण्यात मयत महिलेची आई हिने फिर्याद दिल्याने मयताचे पती, सासू, जेठ,यांच्याविरुद्ध भाग ५गु.र.न.११६/२०२५ बी. एन.एस.कलम १०८, ८०,११५,(२)३५२, ३, (५) या कलम प्रमाणे गुन्हा दाखल झाला असून यात पती मोसिन यास अटक करण्यात आली असून त्यास रावेर न्यायालयात हजर केले असता दोन दिवसाची पोलीस कोठडी मिळाली आहे याबाबत पुढील तपास उपविभागीय अधिकारी कृष्णांत पिंगळे स.पो.नी हरिदास बोचरे यांच्या मार्गदर्शनाखाली फौजदार दिपाली पाटील हे.का. अविनाश पाटील व पोलीस तपास करत आहे.

सासरच्या मंडळींकडून विवाहितेला मारहाण

चाळीसगाव । प्रतिनिधी

चाळीसगाव भाऊ घरी भेटण्यास आल्याच्या कारणातून दिर व सासु-सासरे यांनी विवाहीतेचे हातपाय धरून दगडाने डोक्यावर मारून जखमी केल्याची घटना शहरात घडली. याप्रकरणी तिघांच्या विरोधात चाळीसगाव शहर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहरातील धुळे रोडवरील पुन्शी पेट्रोलपंप परिसरात राहणाऱ्या २९ वर्षीय विवाहीतेचा भाऊ तिच्या राहत्या घरी भेटण्यास आला असता, दीर व सासू-सासऱ्यांनी तुझ्याकडे आलेला कुठलाही नातेवाईक मला घरात चालणार नाही असे सांगत भांडण उकरून काढत विवाहीतेला धरून ठेवत हातातील दगड विवाहीतेच्या डोक्यावर मारून दुखापत केली व विवाहीतेची आई सोडवण्यासाठी आली असता, त्यांनाही शिवीगाळ करत दमदाटी केली. ही घटना दि. २० जून रोजी सकाळी ६ वाजेच्या सुमारास घडली. याप्रकरणी विवाहीतेच्या फिर्यादीवरून दीर दिनेश पवार, सासू इंदुबाई पवार, सासरे पुनमचंद पवार यांच्या विरोधात चाळीसगाव शहर पोलीस स्टेशनला भा.न्या. सं. कलम ११८(२), ३५१ (२).३५२. ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस करीत आहेत.

जाहिर नोटीस

तमाम लोकांना, वित्तीय संस्थांना बँकांना, सरकारी क्रेडीट सोसायटी, को. ऑप. बँक, पतसंस्था, निमसरकारी कार्यालये व १) श्रीमती सरला बाळकृष्ण काळे, २) विनोद बाळकृष्ण काळे, ३) ज्ञानदेव वसंत काळे सर्व रा. जळगांव, ता. जि. जळगांव यांना व त्याचे कुटुंबातील घटकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते ते खालीलप्रमाणे:-

मिळकतीचे वर्णन :- तुकडी जिल्हा जळगांव, पोट तुकडी तालुका जळगांव पैकी मौजे आव्हाणे शिवारातील आव्हाणे ग्रामपंचायत हद्दीतील :-

मौजे आव्हाणे शेत गट नं. २३० याचे एकुण क्षेत्र ०० हेक्टर ८५आर यास आकार रूपये ९=१८ पैसे यांसी चतु: सिमा :- पुर्वेस - गट नं. २२७, पश्चिमेस - गट नं. २३१, उत्तरेस - वापर वं रोड रस्ता, दक्षिणेस- गट नं.२२९.

येणेप्रमाणे वर नमुद चतु:सिमेतील शेत मिळकत ही आमचे पक्षकार १) श्रीमती सुशिलाबाई रामचंद्र ढोले, २) सुरेखा भगवान सिंघाणे ३) शारदा सुरेश मोरे, ४) रमेश रामचंद्र ढोले मयत यांचे वारस कविता रमेश ढोले, ५) मच्छिंद्र रामचंद्र ढोल यांचे सामाईकातील मालकीची होती व आहे. सदर मिळकत विक्री करण्या संदर्भात दि.२२/१०/२०२३ रोजी १) श्रीमती सरला बाळकृष्ण काळे, २) विनोद बाळकृष्ण काळे, ३) ज्ञानदेव वसंत काळे यांच्या सोबत सौदा रक्कम रूपये १,२१,००,०००/- अक्षरी रुपये एक कोटी एकवीस लाख मात्रवर ठरलेला होता. सदरच्या व्यवहारापोटी बयाणा म्हणुन रक्कम रूपये १०,१९,०००/- अक्षरी रूपये दहा लाख अकरा हजार मात्र देण्यात आलेला होता. परंतु काही अपरिहार्य कारणास्तव सदरचा व्यवहार हा पुर्ण करणे शक्य नसल्याने आमचे पक्षकार व १) श्रीमती सरला बाळकृष्ण काळे, २) विनोद बाळकृष्ण काळे, ३) ज्ञानदेव वसंत काळे यांचे मध्ये आपसात वोलणी होवुन सदरचा व्यवहार रद्द करण्याबाबत दि.०२/०६/२०२५ रोजी रू.१००/- च्या स्टॅम्प पेपर नं. २७एबी ०१९८५१ वर सौदापावती करारनामा रद्द लेख लिहीण्यात आ-लेला असुन आमचे पक्षकार यांना १) श्रीमती सरला बाळकृष्ण काळे, २) विनोद बाळकृष्ण काळे, ३) ज्ञानदेव वसंत काळे यांनी दिलेली बयाणा रक्कम रुपये १०,१९,०००/- अक्षरी रुपये दहा लाख अकरा हजार मात्र ही देखील आमचे पक्षकार यांनी १) श्रीमती सरला बाळकृष्ण काळे, २) विनोद बाळकृष्ण काळे, ३) ज्ञानदेव वसंत काळे यांना परत केलेली आहे व सदरचा व्यवहार संपुष्टात आलेला आहे. त्याप्रमाणे आमचे पक्षकार हे सदरची मिळकत ही भविष्यात दुसऱ्या पक्षाला विकण्यास पुर्णतः मोकळे झालेले आहेत. व सदर बाबीस कोणाचीही हरकत असल्यास ०७ (सात) दिवसांच्या आत आमचेकडे लेखी स्वरूपात कागदपत्रांची पुर्तता करुन हरकत नोंदवावी.

सदरची जाहीर नोटीस आमचे अशिलांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन, पुरविलेल्या कागदपत्रांवरुन आज रोजी आमचे अशिलांचे खर्चाने प्रसिध्दीस दिली असे.

नोटीस देणारर्फे
अॅड. वैभव पी. जोशी
ऑफिस पत्ता- ३, तिसरा मजला
जे. टी. बॅबर्स, जिल्हा न्यायालया समोर, जळगांव
मो.नं.९३७२७२५७५

स्थल - जळगांव
दि. /०६/२०२५

जाहीर नोटीस देण्यास हरकत नाही.

सही/- १) श्रीमती सरला बाळकृष्ण काळे, सही/- २) विनोद बाळकृष्ण काळे सही/- ३) ज्ञानदेव वसंत काळे

जाहीर नोटीस देणार - सही

सही/- १) श्रीमती सुशिलाबाई रामचंद्र ढोले, सही/- २) सुरेखा भगवान सिंघाणे, सही/- ३) शारदा सुरेश मोरे, सही/- ४) रमेश रामचंद्र ढोले मयत यांचे वारस कविता रमेश ढोले, सही/- ५) मच्छिंद्र रामचंद्र ढोले